**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांक: 09.06.2024** **वारः रविवार**

----------------------------------------------------------------------------------------

**ठळक बातम्या**

1. **नरेंद्र मोदी यांचा पंतप्रधानपदाचा शपथविधी सोहळा आज संध्याकाळी राष्ट्रपती भवनात होणार, सोहळयासाठी शेजारील राष्ट्रप्रमुखांची विशेष उपस्थिती.**
2. **इस्रायलकडून गाझापट्टीमध्ये सुरु असलेला नरसंहार थांबावा म्हणून कोलंबियाकडून कोळसा निर्यात बंद.**
3. **राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा अर्थात नीट पारदर्शकरित्या पार पडली असल्याचा राष्ट्रीय परीक्षा परिषदेचा निर्वाळा.**
4. **टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तान यांच्यात लढत.**

**आणि**

5. **महाराष्ट्रात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांसाठी मुसळधार ते अति पावसाचा इशारा.**

**शपथग्रहण**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधानपदी नियुक्त नरेंद्र मोदींना नवीन सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केलं असून केंद्रातील नव्या सरकारचा शपथविधी सोहळा आज संध्याकाळी राष्ट्रपती भवनात होणार आहे. आज संध्याकाळी सव्वा सात वाजता हा सोहळा होणार आहे. यावेळी राष्ट्रपती, मोदी आणि केंद्रीय मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. शुक्रवारी, नरेंद्र मोदींनी राष्ट्रपतींची भेट घेतली आणि नवीन सरकार स्थापन करण्याचा दावा केला.

भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष जे पी नड्डा यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजे एनडीएच्या शिष्टमंडळानंही राष्ट्रपतींची भेट घेतली होती आणि नरेंद्र मोदी यांची भाजपाच्या संसदीय पक्षाच्या नेत्याची निवड झाल्याचं पत्र तसंच एनडीएच्या घटक पक्षांच्या पाठिंब्याची पत्रंही राष्ट्रपतींना सादर करण्यात आली होती. आजच्या या शपथविधी सोहळ्याला शेजारील देशांतील अनेक नेत्यांना निमंत्रित करण्यात आलं असून श्रीलंकेचे अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे, मालदीवचे अध्यक्ष डॉ. मोहम्मद मुइज्जू, सेशेल्सचे उपाध्यक्ष अहमद अफिफ आणि बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद कुमार जुगनाथ, नेपाळचे पंतप्रधान पुष्पा कमल दहल 'प्रचंड' आणि भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे या समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान शपथविधी सोहळ्यानिमित्त सुरक्षेसाठी दिल्ली पोलिसांनी कडक उपाययोजना केल्या आहेत. शपथविधी समारंभात पॅराग्लायडर्स, पॅरामोटर, हँग ग्लायडर, मानवरहित एरियल व्हीकल्स आणि हॉट एअर बलून यांच्या उड्डाणाला मनाई केली आहे.

**आकाशवाणी**

राष्ट्रपती भवनात आज होणाऱ्या शपथविधी सोहळ्याचं थेट प्रसारण आकाशवाणी दिल्लीवरुन संध्याकाळी पावणेसात वाजल्यापासून एफएम गोल्ड, इंद्रप्रस्थ आणि आकाशवाणी लाईव न्यूज 24X7 आणि युट्यूबवाहिनीवरून करण्यात येईल. अहमदाबाद, बेंगळुरू, चेन्नई, कटक, गुवाहाटी, हैदराबाद, इंफाळ, कोलकाता, मुंबई आणि तिरुअनंतपुरममधील आकाशवाणी केंद्रं त्यांच्या प्रादेशिक भाषांमधुनही हे प्रसारण करणार आहेत.

**काँग्रेस**

काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांची काँग्रेसच्या संसदीय पक्ष नेतेपदी एकमतानं निवड करण्यात आली आहे. काँग्रेसच्या पक्षाचे नेते राजीव शुक्ला यांनी काल प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं की सोनिया गांधी यांनी हे पद स्वीकारलं आहे. तसंच काँग्रेस कार्यकारिणीनं पक्षाचे नेते राहुल गांधी यांना लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची भूमिका स्वीकारण्याची विनंती करणारा ठरावही एकमतानं मंजूर केला.

**कोलंबिया-कोळसा**

इस्राईलकडून गाझापट्टीमध्ये सुरु असलेला नरसंहार थांबत नाही तोपर्यंत इस्राईलला कोळसा निर्यात केला जाणार नाही, असं कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी  समाजमाध्यमावरील संदेशात जाहीर केलं. इस्राईलनं गाझापट्टीतून आपलं सैन्य मागं घ्यावं या आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या आदेशाचं पालन केल्यास कोलंबियाकडून कोळशाची निर्यात पुन्हा सुरू होईल, असंही स्पष्ट सांगण्यात आलं आहे. कोलंबियाच्या राष्ट्रीय सांख्यिकी विभागाच्या मते, इस्राईलला केलेली कोळशाची निर्यात गेल्या वर्षीच्या पहिल्या आठ महिन्यांत 320 दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त होती.तर अमेरिकन जर्नल फॉर ट्रान्स्पोर्टेशनच्या म्हणण्यानुसार इस्राईल आपला ५० टक्क्यांहून अधिक कोळसा कोलंबियामधून आयात करतो आणि त्यातील बराचसा कोळसा  इस्राईल वीज प्रकल्पांसाठी  वापरतो.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भारतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**सर्वेक्षण**

ऑगस्ट 2022 ते जुलै 2023 या कालावधीत ग्रामीण भारताचा सरासरी मासिक भांडवली खर्च हा शहरी भागाच्या तुलनेत 71 टक्क्यांनी कमी असल्याचं सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं घरगुती वापरावरील खर्चासबंधी केलेल्या सर्वेक्षणात आढळून आलं आहे. या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील नागरिकांचा सरासरी मासिक भांडवली खर्च हा तीन हजार ७७३ रुपये नोंदवला गेला तर याच काळात शहरी भागातील नागरिकांचा सरासरी मासिक भांडवली खर्च हा अंदाजे सहा  हजार ४५९ रुपये होता. तर 2022-23 या कालावधीत, ग्रामीण भागातील नागरिकांनी आपल्या घरगुती वापरावरील खर्चाच्या 46 टक्के खर्च  हा अन्नासाठी केला. यामध्ये  खाद्यपदार्थांमधील पेये, अल्पोपहार आणि आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांवरील कराचा खर्च सर्वाधिक आहे, आणि त्यानंतर दूध, दुग्धजन्य पदार्थ आणि भाजीपाला यांचा क्रमांक लागतो, असं या सर्वेक्षणात आढळून आलं आहे. तर  देशाच्या शहरी  भागातील नागरिकांचा अन्नपदार्थांवरील खर्च सुमारे 39 टक्के आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय  हे 1950 मध्ये स्थापन झाल्यापासून नियमितपणे घरगुती वापर खर्चाचं देशव्यापी सर्वेक्षण करत असतं.

**केरळ-मासेमारी बंद**

माशांच्या प्रजननाचा हंगाम सुरु झाल्यानं त्यावर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी केरळमध्ये, मासेमारी करण्यास 52 दिवसांची बंदी लागू झाली आहे. त्यामुळे आज मध्यरात्रीपासून राज्याच्या किनारपट्टीवरचा यांत्रिक बोटींचा वावर 31 जुलैपर्यंत बंद राहील. केरळ राज्य सरकारनं इतर राज्यांतील मासेमारी जहाजांना मध्यरात्रीपूर्वी केरळ किनारपट्टीतून बाहेर पडण्याच्या सूचना दिल्या आहेत. या बंदी कालावधीत मासेमारांना मोफत रेशन दिलं जाणार आहे.

**जम्मू काश्मीर**

जम्मू आणि काश्मीरच्या केंद्रशासित प्रदेशात, देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याबद्दल चार कर्मचाऱ्यांना सरकारनं भारतीय राज्यघटनेच्या कलम 311 नुसार निलंबित केलं आहे. या निलंबित कर्मचाऱ्यांमध्ये जम्मू - काश्मीर पोलिस विभागातले दोन कॉन्स्टेबल, शिक्षण विभागातील एक शिक्षक आणि जम्मू आणि काश्मीर सरकारच्या जलशक्ती विभागातील एका सहायक लाइनमनचा समावेश आहे. दहशतवादी कारवायांमध्ये सहभाग असलेल्या या कर्मचाऱ्यांच्या हालचाली कायदा अंमलबजावणी आणि गुप्तचर संस्थांच्या निदर्शनाला आल्या होत्या. दरम्यान, सरकारी सेवेत असल्याचा गैरफायदा घेणाऱ्या देशद्रोही घटकांना कदापि खपवून न घेण्याचं धोरण सरकारनं स्वीकारलं आहे.

**डेन्मार्क**

डेन्मार्कचे पंतप्रधान मेट फ्रेडरिक्सन यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निषेध केला आहे. फ्रेडरिक्सन यांच्यावर झालेल्या हल्ल्याचं वृत्त ऐकून आपण खूप चिंतेत असल्याचं त्यांनी एका समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. मोदी यांनी फ्रेडरिक्सन यांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. शुक्रवारी संध्याकाळी मध्य कोपनहेगनमध्ये डॅनिश पंतप्रधानांवर एका अज्ञात व्यक्तिनं  प्राणघातक हल्ला केला होता.

**फ्रेंच ओपन**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीचं विजेतेपदक काल पोलंडच्या इगा स्विटेकनं पटकावलं. फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेचं तिचं हे चौथं विजेतेपदक आहे. इटलीच्या जास्मिन पाओलिनीवर तिनं ६-२, ६-१ अशी सहज मात केली. सलग तीन फ्रेंच ओपन विजेतेपद पटकावणारी ती तिसरी महिला खेळाडू ठरली आहे. पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत काल जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हनं कॅस्पर रूडला २-६, ६-२, ६-४, ६-२ असं पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याचा विजेतेपदासाठीचा सामना आज  स्पेनच्या कार्लोस अल्कराजशी होणार आहे. 21 वर्षीय अल्कराज तिन्ही प्रकारच्या टेनिस कोर्टवर ग्रँडस्लमच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारा सगळ्यात युवा खेळाडू ठरला आहे.

**क्रिकेट**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तान यांच्यात लढत होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता या सामन्याला सुरू होणार आहे. तिसऱ्या सामन्यात ओमानचा सामना 'ब' गटातल्या स्कॉटलंडशी होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री साडे दहा वाजता सुरू होणार आहे.दरम्यान काल रात्री ऑस्ट्रेलियानं इंग्लंडचा 36 धावांनी पराभव केला.तर अन्य एका सामन्यात, दक्षिण आफ्रिकेनं नेदरलँड्सचा चार गडी राखून पराभव केला.

**हवामान**

येत्या ४ दिवसांत पूर्व आणि मध्य भारताच्या काही भागात उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशा, पंजाब आणि हरियाणा या राज्यांमध्ये 12 जून पर्यंत उष्णतेची लाट असेल असं आय एम डी नं म्हटलं आहे. देशाच्या पूर्व भागात उद्यापर्यंत कमाल तापमान 2 ते 3 अंश सेल्सिअनं तर वायव्य भागात पुढील 4 दिवसांत 3 ते 4 अंश सेल्सिअसनं वाढण्याची शक्यता तर उर्वरित भागांत कमाल तापमानात कोणताही लक्षणीय बदल अपेक्षित नाही. दरम्यान, ईशान्य भारत, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, ओडिशा, आणि मध्य प्रदेशात विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभांगांनं वर्तवला आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडसह गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ आणि लक्षद्वीपमध्येही ही परिस्थिती कायम राहील, असं आयएमडीने म्हटलं आहे.

दरम्यान, महाराष्ट्रात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांसाठी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. नैऋत्य मोसमी पाऊस मध्य अरबी समुद्राच्या काही भागात आणि देशाच्या इतर भागांसह दक्षिण महाराष्ट्रात पुढे सरकला असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**